स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | सत्यमेव जयते | महाराष्ट्र शासन

# जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन



२०६ नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला टोकरतलाव रोड, नंदुरबार 02564-210014, 210015 dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar


## माननीय केंद्रिय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री तथा ग्रामिण विकास मंत्री यांचा नंदुरबार जिल्हा दौरा

## दि. ८ एप्रिल २०२५

# वृत्तपत्रीय कात्रणे

शासन वृत्तांत
जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार
२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५
Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar


दैनिक लोकमत, नंदुरबार दि. ८ एप्रिल २०२५


लोकमत


# नैसर्गिक शेती करून उत्पादकता वाढवा

## केंद्रीय कृषी मंत्री चौहाण यांचे आवाहन, उपक्रमांचा शुभारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** नैसर्गिक शेती करून किटकनाशकमुक्त, कॅन्सरमुक्त शेतीला चालना द्यायला हवी. त्यामुळे जमिनीचे आरोग्य टिकून राहील आणि उत्पादकताही वाढेल. केंद्र सरकार प्रोत्साहन देत आहे. त्यासाठी लागणाऱ्या प्रयोग व औजारांसाठी प्रति एकर चारण हजारांचे साहाय्य करत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहाण यांनी केले.

ते आज डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषी विज्ञान केंद्र, नंदुरबार आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र द्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रमात उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळ्या प्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी कृषिमंत्री व पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल



काकोडकर, आमदार डॉ. विजयकुमार गावित, विधानपरिषद सदस्य चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमशा पाडवी, राजेश पाडवी, कुलगुरू डॉ. विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, एमसीआरसीएमचे कार्यकारी अधिकारी नीलेश सागर, पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मा.वी. भागय्याजी, डॉ. एस.के. रॉय, योजकचे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे, डॉ. एन. जी. शहा, केदारनाथ कवडीवाले, डॉ. नितीन पंचभाई, राजेंद्र दहातोंडे, सरपंच मोहिनी वळवी उपस्थित होते.

पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. गजानन डांगे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

## कौशल्य शिक्षण आणि शिक्षणाची जोड हवी...

मंत्री चौहाण म्हणाले, जेव्हा अमेरिका, युरोपियन देशांचा जन्मही झाला नव्हता, तेव्हा भारताच्या ढाक्क्यात रेशीम वस्त्र बनत होते. पोलाद बनवून जगभरात निर्यात केले जात होते. अनादी काळापासून येथील आदिवासी शेतीची औजारे स्वत: बनवत होते, स्वावलंबी होते.

आज याच बांधवांना थोडे कौशल्याचे शिक्षण आणि मार्गदर्शन लाभले, तर ते संपूर्ण मानवी समुदायाला समृद्ध करू शकतात आणि असे शिक्षण आणि मार्गदर्शनाचे काम या कृषी विज्ञान केंद्रात सुरू आहे.

कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून येथील महिलांनी भगरीपासून बिस्किटे बनवली आहेत, डाळीवर प्रक्रिया करणारी यंत्रे विकसित केली आहेत. आज अशाच छोट्या-छोट्या प्रयोगांमधून देशात सुमारे एक कोटी ४८ लाख महिला लखपती दीदी झाल्या आहेत.

राज्याची माझी लाडकी बहिण ही योजना देखील चांगली असून यामुळे गरीब आणि गरजू महिलांच्या सक्षमीकरणाला भर मिळणार आहे.


Hello Nandurbar
Page No. 1 Apr 08, 2025
Powered by: erelego.com

दैनिक लोकमत, नंदुरबार दि. ८ एप्रिल २०२५

## लोकमत



नंदुरबार येथील कृषी संशोधन केंद्रात आदिवासी महिलांशी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सोमवारी संवाद साधला, सोबत माणिकराव कोकाटे.

Jalgaon Main
Page No. 4 Apr 08, 2025
Powered by: erelego.com

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार
२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५
Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar

दैनिक लोकमत, नंदुरबार दि. ८ एप्रिल २०२५

लोकमत

# ‘कृषी क्षेत्रात देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल’

## गारपीटग्रस्तांना केंद्राकडूनही गरजेनुसार मदत : शिवराज चौहान

लोकमत न्यूज नेटवर्क

नंदुरबार : देश कृषी क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याकडे वाटचाल करीत आहे. कृषीविषयी विविध कायदे करून शेतमालाला चांगला भाव मिळेल यासाठी प्रयत्न केला जात आहे. राज्यात नुकत्याच झालेल्या गारपीटमधील नुकसानीसाठी राज्य सरकार मदत करेलच, परंतु कमी पडल्यास केंद्र सरकारही मदत करणार असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सोमवारी नंदुरबारात पत्रकारांशी बोलताना दिली.

नंदुरबार येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित कृषी मंडपम आणि महिला तंत्रज्ञान उद्यान उपक्रमाचे त्यांच्या हस्ते सोमवारी दुपारी लोकार्पण झाले.

ते म्हणाले, पीक उत्पादन खर्चाच्या तुलनेत नफा शेतकऱ्यांना मिळावा यासाठी २०१९ मध्येच केंद्राने कायदा केला आहे. कृषी धोरण राबविताना शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवला आहे. सोयाबीन उत्पादन मोठ्या प्रमाणावर असल्याने सोयाबीन तेलावरील आयातीवर २७ टक्के कर लावला आहे.

शेतीच्या माध्यमातून गरिबी कमी करण्यासाठी गावे गरिबीमुक्त करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. त्यादृष्टीने आपण काम करीत असल्याचे सांगत राज्याची लाडकी बहीण योजना यशस्वी झाली असून आता केंद्राच्या माध्यमातून ३ कोटी लखपती दीदी बनविण्यात येत आहेत. पैकी एक कोटी ३८ लाख दीदी लखपती झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे उपस्थित होते.

Jalgaon Main
Page No. 4 Apr 08, 2025
Powered by: erelego.com

भारत 2023 INDIA
महाराष्ट्र शासन

# शासन वृत्तांत

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५
Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar

दैनिक दिव्य मराठी, नंदुरबार — दि. ८ एप्रिल २०२५

**लोकार्पण** • केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांचे प्रतिपादन

## कृषी विज्ञान केंद्राने नैसर्गिक शेतीसाठी संशोधनावर भर देण्याची आवश्यकता

### कोळदा येथे कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् तंत्रज्ञान पार्कचे उद्घाटन

प्रतिनिधी | नंदुरबार

सामान्य व आदिवासींचा विकासासाठी नैसर्गिक शेती, जलसंधारण व प्रक्रिया उद्योग या क्षेत्रात भरीव कामगिरी गरजेची आहे. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करावा लागेल, जिल्ह्यात भगर, डाळींवर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र उद्योग उभारता येतील. शेतीत रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर वाढला आहे. आधी शेतीला विषमुक्त करावे लागेल. गाय, गोमूत्र आणि शेणखताच्या वापरातून नैसर्गिक शेती करणे गरजेचे आहे. यासाठी केव्हीके सारख्या संस्थांनी गावांची निवड करून, त्याठिकाणी नैसर्गिक शेतीचा जागर करावा, असे आवाहन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी कोळदे येथे केले.

डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र द्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रमांतर्गत उभारलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळा केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याहस्ते झाला. अध्यक्षस्थानी डॉ. हेडगेवार सेवा समितीचे अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले होते. यावेळी रा.स्व.संघाचे अ.भा. कार्यकारिणी सदस्य वी. भागय्या, राज्याचे कृषिमंत्री तथा नंदुरबारचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, आमदार डॉ. विजयकुमार गावित, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमशा पाडवी, आमदार राजेश पाडवी उपस्थित होते.



बचत गटाच्या महिलांशी चर्चा करताना केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान सोबत माणिकराव कोकाटे, आमदार आमश्या पाडवी, डॉ. हीना गावित आदी.

#### दळणवळणासाठी प्रयत्न

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले, शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळून चांगल्या प्रतीचे अन्न कसे उत्पादित होईल, यासाठी प्रयत्न करावेत. जिल्ह्यात रस्ते, कनेक्टिव्हिटी, सुविधांचा अभाव आहे. कनेक्टिव्हिटी वाढून त्याचा उत्पन्न वाढीसाठी कसा फायदा होईल, यासाठी दळवणाच्या सुविधांचा विकासाच्या दृष्टीने प्रयत्नरत असल्याचे सांगितले.

#### गावागावात कृषी विज्ञान केंद्र व्हावेत

रा.स्व.संघाचे सदस्य भागय्या म्हणाले, दोन दिवसांत जिल्ह्यातील आदिवासी बांधवांमध्ये स्वावलंबन व आत्मविश्वास पाहिला. भारत हा कृषिप्रधान देशासह उद्योगांचा देश आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक योजना आल्या मात्र, योग्य अंमलबजावणी झाली नाही. खऱ्या अर्थाने शेतकरी राजा होण्यासाठी गावागावात कृषी विज्ञात केंद्र व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

भारत 2023 INDIA
महाराष्ट्र शासन

# शासन वृत्तांत

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५
Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar

दैनिक पुण्य नगरी, नंदुरबार    दि. ८ एप्रिल २०२५

पुण्य नगरी

## नैसर्गिक शेती, जलसंधारण आणि प्रक्रिया उद्योग या त्रिसूत्रीवर भर

# गरीबीमुक्त, स्वावलंबी गावांचा संकल्प

**केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत कृषक ज्ञान विज्ञान मंडपम आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्कचे लोकार्पण**






**नंदुरबार** : शेतीतून विकास साधायचा असेल तर नैसर्गिक शेती, जलसंधारण आणि प्रक्रीया उद्योग या त्रिसूत्रीवर आधारित कामासाठी समाज,लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सरकार यांनी समन्वय साधण्याची गरज आहे.यातूनच आपण गांवे स्वावलंबी आणि गरिबीमुक्त करु शकतो. दर्जेदार अन्न निर्मितीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले तर देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी बनेल आणि गरीबीमुक्त होईल. त्यासाठी सरकार सोबत जनतेचा पुढाकार आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक शेतीसाठी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषि, शेतकरी कल्याण मंत्री तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केले.

ते डॉ.हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्राद्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रम अंतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळ्याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी कृषिमंत्री तथा पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ.अनिल काकोडकर, माजी मंत्री डॉ.विजयकुमार गावित, विधानपरिषद सदस्य चंद्रकांत रघुवंशी, आ.आमशा पाडवी, राजेश पाडवी, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगांवचे कुलगुरु डॉ.विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, एमसीआरसीएम मुंबईचे कार्यकारी अधिकारी निलेश सागर, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवण दत्त एस, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ.भा. कार्यकारीणी सदस्य मा.वी.भागय्याजी, भा. कृ.अ.नु.प.अटारी पुण्याचे संचालक डॉ.एस. के.रॉय, योजकचे (पुणे)अध्यक्ष डॉ.गजानन डांगे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे सदस्य सचिव डॉ.एन.जी.शहा, डॉ.हेडगेवार सेवा समिती अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले, सचिव डॉ.नितीन पंचभाई, कृषि विज्ञान केंद्र प्रमुख राजेंद्र दहातोंडे, कोळदाचे सरपंच मोहिनी वळवी आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना केंद्रीय कृषिमंत्री मंत्री श्री.चव्हाण म्हणाले, नंदुरबार जिल्ह्यातील लोक मागणारे नाहीत, झुकणारे नाहीत, थेट निधड्या छातीने, आत्मविश्वासाने पुढे जाणारे आहेत. फक्त त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे.अनादी काळापासून येथील आदिवासी बांधव आपल्या शेतीची औजारे स्वतः बनवत होते, स्वावलंबी होते. आज याच बांधवांना थोडे कौशल्याचे शिक्षण आणि मार्गदर्शन लाभले तर ते संपूर्ण मानवी समुदायाला समृद्ध करू शकतात आणि असे शिक्षण आणि मार्गदर्शनाचे काम या कृषि विज्ञान केंद्रात सुरु असल्याने समाधान व्यक्त केले. यापुढे मंत्री चौहान म्हणाले की, विश्वकर्मासारख्या योजनेत गावातील विविध पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांचे सर्वेक्षण करा, प्रशिक्षण द्या, त्यांना सुविधा द्या, गाव स्वावलंबी आणि गरीबीमुक्त करा. ही योजना आपल्या जिल्ह्यात राबवून आपले गाव, जिल्हा आदर्श बनविण्यासाठी आपल्या सर्वांना पुढे यावे लागेल, असेही केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी यावेळी सांगितले. लहान प्रक्रीया उद्योग राबवत आज देशातील एक कोटी ४८ लाख महिला लखपती दीदी झाल्या आहेत. (पान ४ वर)

### 'यह दूरी अच्छी नही लगती 'थेट जनतेत जावून साधला संवाद

केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान मनोगत व्यक्त करत असतांना नेता आणि जनता यामध्ये अंतर असणे उचित वाटत नसल्याचे सांगत त्यांचे मनोगत संपल्यानंतर त्यांनी थेट जनतेत जावून संवाद साधला.यावेळी शेतकऱ्यांनी मंत्र्यांजवळ विविध अडचणी मांडल्या.मंत्री चौहान यांनीदेखील शेतकरी आणि महिला शेतकऱ्यांशी आपुलकीनं संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.यावेळी सुरक्षेच्यादृष्टीनं पोलीसांची कसरत झाली.

### कृषी मंत्र्यांनी अशी सांगितली गाव विकासाची त्रिसूत्री

काही गावातील काही एकर मर्यादीत क्षेत्रात नैसर्गिक शेती करून किटकनाशकमुक्त, कॅन्सरमुक्त शेतीला चालना द्यायला हवी. त्यामुळे जमीनीचे आरोग्य टिकून राहील आणि उत्पादकताही वाढेल. यामुळे नैसर्गिक शेतीवर भर देण्याचे आवाहन केले.तसेच जलसंधारण आज काळाची गरज बनली आहे. पावसाचा वाहून जाणारा प्रत्येक थेंब जमिनीत कसा मुरवता येईल, यासाठी उपाययोजना करायला हव्यात. मनरेगाच्या माध्यमातून त्यासाठी आताच कामे हाती घ्यायला हवीत. त्यासाठी कुठल्याही प्रकारच्या निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. तापी नदीच्या उपलब्ध पाण्याचा वापर शेतीसाठी करायला हवा. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून तुषार सिंचनाचे प्रयोग करून शेतात पाणी मुरवता येऊ शकेल. त्याचप्रमाणे प्रकीया उद्योगातून महिला सक्षमीकरणावर भर देता येणार आहे.यामुळे गरीबीमुक्त गावांसाठी नैसर्गिक शेती, जलसंधारण व कृषी आधारीत प्रकीया उद्योग उभारणीवर काम करण्याची गरज मंत्री चौहान यांनी व्यक्त केली.

Nandurbar Edition
Apr 08, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

दैनिक पुण्य नगरी, नंदुरबार    दि. ८ एप्रिल २०२५

पुण्य नगरी

पान १ वरुन

## गरीबीमुक्त, स्वावलंबी...

देशातील महिला आपल्या पायावर उभ्या राहून शेती आणि मातीचे विज्ञान शिकून शेती प्रक्रिया उद्योग मोठ्या दिमाखाने चालवत आहेत. येणाऱ्या काळात शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील अंतर कमी करून दोघांच्या फायद्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे यावेळी केंद्रीय मंत्री चौहान यांनी सांगितले. पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, देशातील ७० टक्के लोकांचा व्यवसाय शेतीवर आधारित आहे. शेती हा अत्यंत गुंतागुतीचा विषय असून शाश्वत शेतीशिवाय शेतकरी त्यात रमत नाही. शेती व्यवसायातून स्थलांतरित होण्याची मानसिकता मोठ्या प्रमाणात असताना कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी सुरु असलेले प्रयत्न नक्कीच शाश्वत शेतीतून या भागाचा कायापालट होणार असल्याचा विश्वास पालकमंत्र्यांनी व्यक्त केला. दरम्यान, शेतकरी मेळावा, बचत गटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात पुण्यातील योजक संस्थेचे अध्यक्ष डॉ.गजानन डांगे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले.पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस.यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा आणि सुव्यवस्थेच्यादृष्टीने सुमारे आठ किमी अंतरापर्यंत ४२ अंश सेल्सिअस तापमानात ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

Nandurbar Edition
Apr 08, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

महाराष्ट्र शासन

# शासन वृत्तांत

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५

Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar


दैनिक देशदूत, नंदुरबार दि. ८ एप्रिल २०२५


देशदूत

नंदुरबार आवृत्ती

epaper.deshdoot.com

08 Apr 2025 - Page 2









## कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्कचे लोकार्पण

### नैसर्गिक शेतीसाठी राज्य आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी : केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण

■ नंदुरबार । प्रतिनिधी

तालुक्यातील कोळदे येथील डॉ. हेडगेवार सेवा समितीचे कृषि विज्ञान केंद्र, आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र द्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रम (उऊक्ष) अंतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान, दर्जेदार अन्न निर्मितीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले तर देशातील प्रेत्येक गाव स्वावलंबी बनेल आणि गरीबीमुक्त होईल. त्यासाठी सरकार सोबत जनतेचा पुढाकार आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक शेतीसाठी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषि, शेतकरी कल्याण मंत्री तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी केले आहे.

यावेळी कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, आ.चंद्रकांत रघुवंशी, आ. आमाश्या पाडवी, आ. राजेश पाडवी, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगांवचे कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, एमसीआरसीएम मुंबईचे कार्यकारी अधिकारी निलेश सागर, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ.भा. कार्यकारीणी सदस्य वी. भागय्याजी, भा.कृ.अ.नु.प.अटारी पुण्याचे संचालक डॉ. एस.के. रॉय, योजक (पुणे) चे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे सदस्य सचिव डॉ. एन.जी. शहा, डॉ. हेडगेवार सेवा समिती अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले, सचिव डॉ, नितीन पंचभाई, कृषि विज्ञान केंद्र प्रमुख राजेंद्र दहातोंडे, कोळदाचे सरपंच श्रीमती मोहिनी वळवी आदि यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना केंद्रीय कृषिमंत्री मंत्री ना.चव्हाण म्हणाले, शेतकऱ्यांच्या आजच्या कार्यक्रमासाठी मी प्रमुख अतिथी नसून एक सेवक म्हणून उपस्थित आहे, एक शेतकऱ्यांच्या परिवारातील सदस्य म्हणून या डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या कृषी विज्ञान केंद्रात मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. लोकशाहीत इकडे आणि जनता तिकडे असे चालत नाही, तशाने कामही होत नाही. जोपर्यंत दोघे मिळून एकत्र येत नाहीत तोपर्यंत विकास शक्य नाही. मला कल्पना आहे, येथील लोक मागणारे नाहित, झुकणारेही नाहीत, थेट निधड्या छातीने, आत्मविश्वासाने पुढे जाणारे आहेत. फक्त त्यांना गरज योग्य मार्गदर्शनाची.

ना. चव्हाण पुढे म्हणाले, जेव्हा अमेरिकेसारख्या युरोपियन देशांचा जन्मही झाला नव्हता, तेव्हा जगभरात लोक झाडांची साल आणि पाने शरीराला गुंडाळून झाकत होते. तेव्हा भारताच्या ढाक्‍यात रेशीम वस्त्र बनत होते. तंत्रविज्ञानाच्या जोरावर पोलाद बनवून जगभरात निर्यात केले जात होते. अनादीकाळापासून येथील आदिवासी बांधव आपल्या शेतीची औजारे स्वत: बनवत होते, स्वावलंबी होते. आज याच बांधवांना थोडे कौशल्याचे शिक्षण आणि मार्गदर्शन लाभले तर ते संपूर्ण मानवी समुदायाला समृद्ध करू शकतात. आणि असे शिक्षण आणि मार्गदर्शनाचे काम या कृषि विज्ञान केंद्रात सुरू आहे, हे काम म्हणजे समाजाला उभे करण्याचे महान कार्य आहे.

ते पुढे म्हणाले, आपण खूप नाही पण कमीतकमी क्षेत्रात कमीतकमी काय करू शकतो, यावर सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. संपूर्ण जिल्ह्यात नाही पण काही गावातील काही एकर मर्यादित क्षेत्रात नैसर्गिक शेती करून किटकनाशकमुक्त, कॅन्सरमुक्त शेतीला चालना द्यायला हवी. त्यामुळे जमीनीचे आरोग्य टिकून राहील आणि उत्पादकताही वाढेल. नैसर्गिक शेतीसाठी भारत सरकार शेतकऱ्यांना सदैव प्रोत्साहन देत असून त्यासाठी लागणाऱ्या प्रयोग व औजारांसाठी केंद्र सरकार प्रति एकर रुपये ४ हजारांचे सहाय्य करते आहे. भविष्यात ते कायम राहील याची मी ग्वाही देत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. रहिमन पानी राखिए, बिन पानी सब सून। या हिंदी दोह्याचा संदर्भ देत मंत्री ना.चव्हाण म्हणाले, आपले प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात, ड्रॉप द रेनफ म्हणजे पावसाचा वाहून जाणारा प्रत्येक थेंब जमिनीत कसा मुरवता येईल, यासाठी उपाययोजना करायला हव्यात. मनरेगाच्या माध्यमातून त्यासाठी आत्ताच कामे हाती घ्यायला हवीत. त्यासाठी कुठल्याही प्रकारच्या निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. तापी नदीच्या उपलब्ध पाण्याचा वापर शेतीसाठी करायला हवा. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून तुषार सिंचनाचे प्रयोग करून शेतात पाणी मुरवता येऊ शकेल.

कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून येथील महिलांनी भगरीपासून बिस्किटे बनवली आहेत, दाळीवर प्रक्रिया करणारी यंत्रे विकसित केली आहेत. आज अशाच छोट्या थोड्या-छोट्या प्रयोगांमधून देशात सुमारे १ कोटी ४८ लाख महिला लखपती दिदी झाल्या आहेत. आज देशातील महिला आपल्या पायावर उभ्या राहून शेती आणि मातीचे विज्ञान शिकून शेती प्रक्रिया उद्योग मोठ्या दिमाखाने चालवत आ-हेत. येणाऱ्या काळात शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील अंतर कमी करून दोघांच्या फायद्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे यावेळी केंद्रीय मंत्री चव्हाण यांनी सांगितले. ते म्हणाले, मोठ्या शहरांमध्ये शेतमाल विक्रीसाठी लागणारा वाहतूक खर्च केंद्र सरकार करण्याच्या विचारात आहे. विश्वकर्मा सारख्या योजनेत गाव-ातील विविध पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांचे सर्वेक्षण करा, प्रशिक्षण द्या, त्यांना सविधा द्या, गाव स्वावलंबी आणि गरीबीमुक्त करा. ही योजना आपल्या जिल्ह्यात राबवून आपले गाव, जिल्हा आदर्श बनविण्यासाठी आपल्या सर्वांना पुढे यावे लागेल असेही केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

**शाश्वत शेतीच्या विकासासाठी**

**शासन सर्वोतोपरी मदत करणार: ना.कोकाटे**

देशातील ७० टक्के लोकांचा व्यवसाय शेतीवर आधारित आहे. शेती हा अत्यंत गुंतागुतीचा विषय असून शाश्वत शेतीशिवाय शेतकरी त्यात रमत नाही. शेती व्यवसायातून स्थलांतरित होण्याची मानसिकता मोठ्या प्रमाणात असताना कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी सुरू असलेले प्रयत्न नक्कीच शाश्वत शेतीतून या भागाचा कायापालट केल्याशिवाय राहणार नाही. अशा या शाश्वत शेतीच्या प्रयत्नांसाठी शासन सर्वतोपरी मदत करेल असे यावेळी राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले.

यावेळी शेतकरी मेळावा, बचत गटांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात पुण्यातील योजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

भारत 2023 INDIA

महाराष्ट्र शासन

# शासन वृत्तांत

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५

Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar

दैनिक देशोन्नत्ती, नंदुरबार — दि. ८ एप्रिल २०२५

देशोन्नती

# स्वावलंबी आणि गरीबीमुक्त गावांसाठी सर्वांचा पुढाकार आवश्यक

## केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांचे तंत्रज्ञान पार्कच्या लोकार्पण प्रसंगी प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन

नंदुरबार : दर्जेदार अन्न निर्मितीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले तर देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी बनेल आणि गरीबीमुक्त होईल. त्यासाठी सरकार सोबत जनतेचा पुढाकार आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक शेतीसाठी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषि, शेतकरी कल्याण मंत्री तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी केले आहे.

ते आज डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषिविज्ञानकेंद्र, नंदुरबार आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र द्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रम अंतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळ्या प्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करताना बोलत होते.



यावेळी कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, विधानपरिषद सदस्य चंद्रकांत रघुवंशी आमदार सर्वश्री आमशा पाडवी, राजेश पाडवी, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, एमसीआरसीएम मुंबईचे कार्यकारी अधिकारी निलेश सागर, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ.भा. कार्यकारीणी सदस्य मा.वी. भागय्याजी, भा.कृ.अ.नु.प.अटारी पुण्याचे संचालक डॉ. एस.के. रॉय, योजक (पुणे) चे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे सदस्य सचिव डॉ. एन.जी. शहा, डॉ. हेडगेवार सेवा समिती अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले, सचिव डॉ. नितीन पंचभाई, कृषि विज्ञान केंद्र प्रमुख राजेंद्र दहातोंडे, कोळदाचे सरपंच श्रीमती मोहिनी वळवी आदि यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय कृषिमंत्री मंत्री चव्हाण म्हणाले, शेतकऱ्यांच्या आजच्या कार्यक्रमासाठी मी प्रमुख अतिथी नसून एक सेवक म्हणून उपस्थित आहे, एक शेतकऱ्याच्या परिवारातील सदस्य म्हणून या डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या कृषी विज्ञान केंद्रात मला उपस्थित राहण्याची संधी मिळाली त्यामुळे मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. लोकशाहीत इकडे आणि जनता तिकडे असे चालत नाही, तशाने कामही होत नाही. जोपर्यंत दोघे मिळून एकत्र येत नाहीत तोपर्यंत विकास शक्य नाही. मला कल्पना आहे, येथील लोक मागणारे नाहित, झुकणारेही नाहीत, थेट निधड्या छातीने, आत्मविश्वासाने पुढे जाणारे आहेत. फक्त त्यांना गरज योग्य मार्गदर्शनाची ! ते पुढे म्हणाले जेव्हा अमेरिकेसारख्या युरोपियन देशाचा जन्मही झाला नव्हता, तेव्हा जगभरातलोक झाडांची सालआणि पाने शरीराला गुंडाळून झाकत होते तेव्हा भारताच्या ढाक्क्यात रेशीम वस्त्र बनत होते. तंत्रविज्ञानाच्या जोरावर पोलाद बनवून जगभरात निर्यात केले जात होते. अनादी काळापासून येथील आदिवासी बांधव आपल्या शेतीची औजारे स्वत: बनवत होते, स्वावलंबी होते. आज याच बांधवांना थोडे कौशल्याचे शिक्षण आणि मार्गदर्शन लाभले तर ते संपूर्ण मानवी समुदायाला समृद्ध करू शकतात. आणि असे शिक्षण आणि मार्गदर्शनाचे काम या कृषि विज्ञान केंद्रात सुरू आहे, हे काम म्हणजे समाजाला उभे करण्याचे महान कार्य आहे. ते पुढे म्हणाले, आपण खूप नाही पण कमीतकमी क्षेत्रात कमीतकमी काय करू शकतो, यावर सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. संपूर्ण जिल्ह्यात नाही पण काही गावातील काही एकर मर्यादित क्षेत्रात नैसर्गिक शेती करून किटकनाशकमुक्त, कॅन्सरमुक्त शेतीला चालना द्यायला हवी. त्यामुळे जमीनीचे आरोग्य टिकून राहील आणि उत्पादकताही वाढेल.

नैसर्गिक शेतीसी भारत सरकार शेतकऱ्यांना सदैव प्रोत्साहन देत असून त्यासाठी लागणाऱ्या प्रयोग व औजारासाठी केंद्र सरकार प्रति एकर रुपये ४ हजारांचे सहाय्य करते आहे. भविष्यात ते कायम राहील याची मी ग्वाही देत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

Dhule Edition
Apr 08, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

दैनिक तरुण भारत, नंदुरबार

दि. ८ एप्रिल २०२५

जळगाव तरुण भारत
08 Apr 2025 - Page 1
epaper.tarunbharatlive.com

## नैसर्गिक शेतीसाठी राज्य, केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी

### केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण : नंदुरबारला कृषक ज्ञान विज्ञान मंडपम्

**नंदुरबार** : दर्जेदार अन्ननिर्मितीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले तर देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी बनेल आणि गरिबीमुक्त होईल. त्यासाठी सरकारसोबत जनतेचा पुढाकार आवश्यक आहे, तसेच

नैसर्गिक शेतीसाठी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याणमंत्री तथा ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी केले.

येथील डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषी विज्ञान केंद्र आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग (महाराष्ट्र) यांच्यातर्फे सिलेज आधारित



परिसर विकास कार्यक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. **(पान २ वर)**

शासन वृत्तांत
जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार
२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५
Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar

दैनिक तरुण भारत, नंदुरबार                                                            दि. ८ एप्रिल २०२५

तरुण भारत
08 Apr 2025 - Page 2
epaper.tarunbharatlive.com

# नैसर्गिक शेतीसाठी राज्य, केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी

(पान १ वरून)

या वेळी कृषिमंत्री तथा पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, माजी मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावित, विधान परिषद सदस्य चंद्रकांत रघुवंशी, आमदार सर्वश्री आमश्या पाडवी, राजेश पाडवी, जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, मुंबई येथील एमसीआरसीएमचे कार्यकारी अधिकारी नीलेश सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. वी. भागय्याजी, भा. कृ. अ. नु. प. अटारी पुण्याचे संचालक डॉ. एस. के. रॉय, योजक (पुणे) चे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे सदस्य सचिव डॉ. एन. जी. शहा, डॉ. हेडगेवार सेवा समितीचे अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले, सचिव डॉ, नितीन पंचभाई, कृषी विज्ञान केंद्रप्रमुख राजेंद्र दहातोंडे, कोळद्याच्या सरपंच मोहिनी वळवी आदी उपस्थित होते.

केंद्रीय कृषिमंत्री चव्हाण म्हणाले की, लोकशाहीत इकडे आणि जनता




तिकडे असे चालत नाही, तशाने कामही होत नाही. जोपर्यंत दोन्ही मिळून एकत्र येत नाहीत, तोपर्यंत विकास शक्य नाही. मला कल्पना आहे, येथील लोक मागणारे नाहीत, झुकणारेही नाहीत, थेट निधड्या छातीने, आत्मविश्वासाने पुढे जाणारे आहेत. फक्त त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे.

या वेळी शेतकरी मेळावा, बचत गटांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमात पुण्यातील योजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र शासन

# शासन वृत्तांत

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

२०६, नवीन प्रशासकीय भवन, दुसरा मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार, दूरध्वनी : २१००१४/ २१००१५

Email : dipronandurbar@gmail.com @InfoNandurbar


दैनिक वार्ता, नंदुरबार दि. ८ एप्रिल २०२५

## स्वावलंबी आणि गरीबीमुक्त गावांसाठी सर्वांचा पुढाकार आवश्यक; नैसर्गिक शेतीसाठी राज्य आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी!-केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण

### कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क चे लोकार्पण संपन्न

नंदुरबार (जिमाका)–दर्जेदार अन्न निर्मितीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले तर देशातील प्रत्येक गाव स्वावलंबी बनेल आणि गरीबीमुक्त होईल. त्यासाठी सरकार सोबत जनतेचा पुढाकार आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक शेतीसाठी केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषि, शेतकरी कल्याण मंत्री तथा ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांनी केले आहे.

ते काल डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृपि विज्ञान केंद्र, नंदुरबार आणि राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग, महाराष्ट्र द्वारे सिलेज आधारित परिसर विकास कार्यक्रम (CADP) अंतर्गत उभारण्यात आलेल्या कृषक ज्ञान विज्ञान मंडपम् आणि महिलांसाठी तंत्रज्ञान पार्क या वास्तूंचा लोकार्पण सोहळ्या प्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित करताना बोलत होते. यावेळी कृपिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित, विधानपरिपद सदस्य चंद्रकांत रघुवंशी आमदार सर्वश्री आमशा पाडवी, राजेश पाडवी, कवियित्री बहिणाबाई




